**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत राज्य अभिसरण आराखड्याची अंमलबजावणी करणेबाबतच्या मार्गदर्शक सूचना.**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन (रोहयो) विभाग**
**शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१८/प्र.क्र.१३८/मग्रारो-१**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०५ नोव्हेंबर, २०१८

वाचा :- १) शासन परिपत्रक क्र. मग्रारो-२०१४/ प्र.क्र. ३५/ मग्रारो-१ नियोजन (रोहयो) विभाग, दिनांक १५ डिसेंबर, २०१४
२) सामर्थ्य म्यॅनुअल (MGNREGS) मधील प्रकरण - ८.

**प्रस्तावना :-**

केंद्र शासनाने महात्मा गांधी नरेगा कायदा २००५ मधील अनुसूची-१ मधील परिच्छेद क्र. ६ नुसार विविध विभागांच्या योजनांचे अभिसरण (Convergence) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेशी करण्याचे धोरण निश्चित केले आहे. या अभिसरण धोरणामुळे महात्मा गांधी नरेगा अंतर्गत इतर विभागाच्या योजनांशी अभिसरणाद्वारे निर्माण होणऱ्या विविध मत्तांची गुणवत्ता व उत्पादकता वाढीस लागणार आहे. अनुसूची १ मधील परिच्छेद ६ मध्ये खालील बाब नमूद आहे,

"The State Government shall take concrete steps to achieve effective inter-departmental convergence till the last milestone implementation level of the works under the Scheme with other Government Scheme / programs has to be made so as to improve the quality and productivity of assets, and bring in synergy to holistically address the multiple dimensions of poverty in a sustainable manner."

मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली टास्क फोर्स समितीच्या दिनांक २८ ऑक्टोबर, २०१४ रोजी झालेल्या बैठकीमध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत इतर विभागांसोबत सागंड घालून अभिसरणाद्वारे कामे घेण्याबाबतच्या राज्य अभिसरण आराखड्यास मान्यता देण्यात आली आहे. सदयस्थितीत राज्यांमध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत विविध प्रकारचे कामे घेण्यात येत असुन यामाध्यमातून सार्वजनिक व वैयक्तिक मत्तेचे निर्माण करण्यात येत आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेसोबत सुरु असलेल्या इतर राज्य व जिल्हास्तरीय योजनेमध्ये अभिसरण केल्यास महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमधील निधी अधिक प्रमाणामध्ये उपयोगात आणता येऊ शकतो. तसेच राज्य व

जिल्हास्तरीय योजनेमधून अधिक प्रमाणावर कामे घेता येवू शकतील. या बाबी विचारात घेता शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

राज्य शासनाच्या विविध विभागांचा अभिसरणाअंतर्गत समावेश करुन अभिसरणाची व्याप्ती वाढविण्यासाठी अभिसरण अंमलबजावणीबाबत खालील प्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

**१) अभिसरण अंमलबजावणी समिती-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेसोबत शासनाच्या इतर विभागांमधील योजनांचे अभिसरण करतांना विविध स्तरावर समन्वय समित्यांची स्थापना करणे आवश्यक आहे. या समितींच्या माध्यमातून विविध विभागांसोबत समन्वय साधून अभिसरणांतर्गत आवश्यक प्रमाणात कामांचे नियोजन करणे व त्यांची अंमलबजावणी करण्याकरिता खालील समित्यांची स्थापना करण्यात येत आहे.

**अ) राज्यस्तरीय अभिसरण समिती-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (म.गां.रा.ग्रा.रो.ह.यो.)अंतर्गत अभिसरण धोरण निश्चित करणे व त्याला अनुसरुन सर्व राज्यस्तरीय यंत्रणांमध्ये समन्वय प्रस्थापित करण्यासाठी समिती स्थापन करण्यात येत आहे. या समितीची रचना खालील प्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| १) मुख्य सचिव | - अध्यक्ष |
| २) अपर मुख्य सचिव (वित्त) | - सदस्य |
| ३) अपर मुख्य सचिव (नियोजन) | - सदस्य |
| ४) अपर मुख्य सचिव (कृषी) | - सदस्य |
| ५) प्रधान सचिव (आदिवासी विकास) | - सदस्य |
| ६) प्रधान सचिव (जलसंपदा) | - सदस्य |
| ७) प्रधान सचिव (सार्वजनिक बांधकाम) | - सदस्य |
| ८) सचिव (ग्रामविकास) | - सदस्य |
| ९) सचिव (वने) | - सदस्य |
| १०) सचिव (सामाजिक न्याय) | - सदस्य |
| ११) सचिव (महिला व बालकल्याण) | - सदस्य |
| १२) सचिव (वस्त्रोद्योग) | - सदस्य |
| १३) सचिव (रोहयो, मृद व जलसंधारण) | - सदस्य |
| १४) सचिव (पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय) | - सदस्य |
| १५) आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र, नागपूर | - सदस्य सचिव |

**ब) जिल्हास्तरीय अभिसरण समिती-**

जिल्हा स्तरावरील सर्व विभागांमध्ये अभिसरण कामांसाठी समन्वय साधण्यासाठी जिल्हास्तरीय अभिसरण समिती गठीत करण्यात यावी. या समितीने जिल्हयाचा अभिसरण आराखडा तयार करुन त्याच्या अंमलबजावणीसाठी सर्व विभागांमध्ये समन्वय साधणे अपेक्षित आहे. तसेच जिल्हयामध्ये अभिसरणांतर्गत घेण्यात आलेल्या कामांचे सनियंत्रण करणे आवश्यक राहील. जिल्हा अभिसरण समितीने अभिसरण कामाच्या अंमलबजावणीबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा. अभिसरण कामांच्या अंमलबजावणीमध्ये निर्माण होणाऱ्या अडचणींची सोडवणूक करुन सर्व संबंधित विभागांना मार्गदर्शन करावे. या समितीची रचना खालीलप्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| १) जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक | - अध्यक्ष |
| २) मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सहजिल्हा कार्यक्रम समन्वयक | - सहअध्यक्ष |
| ३) जिल्हयातील सर्व उपवनसंरक्षक | - सदस्य |
| ४) जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी | - सदस्य |
| ५) उपसंचालक सामाजिक वनिकरण | - सदस्य |
| ६) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा | - सदस्य |
| ७) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत/ नरेगा) | - सदस्य |
| ८) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प | - सदस्य |
| ९) जिल्हा समाजकल्याण अधिकारी (जिल्हा परिषद) | - सदस्य |
| १०) सहायक आयुक्त, समाजकल्याण | - सदस्य |
| ११) कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद | - सदस्य |
| १२) कार्यकारी अभियंता (सार्वजनिक बांधकाम) | - सदस्य |
| १३) जिल्हा रेशिम विकास अधिकारी | - सदस्य |
| १४) कार्यकारी अभियंता (सिंचन), जिल्हा परिषद | - सदस्य |
| १५) उपजिल्हाधिकारी (रोहयो) | - सदस्य सचिव |

जिल्हास्तरीय अभिसरण समन्वय समितीमध्ये उपरोक्त नमुद अधिकाऱ्यांव्यतिरिक्त जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांचा समावेश करण्याची आवश्यकता वाटल्यास जिल्हाधिकारी यांनी आमंत्रित सदस्य म्हणून त्यांचा समावेश या समितीमध्ये करावा.

**क) तालुकास्तरीय अभिसरण समिती-**

तालुका स्तरावरील सर्व विभागांमध्ये समन्वय साधण्यासाठी तालुकास्तरीय अभिसरण समितीचे गठन करण्यात यावे. या समितीची महत्त्वाची भूमिका ही अभिसरणाचा तालुका नियोजन आराखडा तयार करणे व त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी करणे यामध्ये राहील. या समितीची रचना पुढील प्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| १) | तहसिलदार तथा तालुका कार्यक्रम अधिकारी | - अध्यक्ष |
| २) | गटविकास अधिकारी तथा सहकार्यक्रम अधिकारी | - सहअध्यक्ष |
| ३) | तालुका कृषी अधिकारी | - सदस्य |
| ४) | तालुका लागवड अधिकारी | - सदस्य |
| ५) | तालुक्यातील सर्व वनपरिक्षेत्रातील अधिकारी | - सदस्य |
| ६) | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प | - सदस्य |
| ७) | उपअभियंता (सावर्जनिक बांधकाम विभाग) | - सदस्य |
| ८) | उपअभियंता (बांधकाम ), जिल्हा परिषद उपविभाग | - सदस्य |
| ९) | उपअभियंता (लघु पाटबंधारे विभाग), जिल्हा परिषद | - सदस्य |
| १०) | उपअभियंता (सिंचन) | - सदस्य |
| ११) | एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी | - सदस्य |
| १२) | सहायक गटविकास अधिकारी | - सदस्य सचिव |

**२) अभिसरण नियोजन आराखडा-**

प्रत्येक आर्थिक वर्षासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत लेबर बजेट व वार्षिक कृती आराखडा ग्रामपंचायती मार्फत ग्रामसभेच्या मान्यतेने तयार करण्यात येतो. या वार्षिक कृती आराखड्यामध्ये ग्रामपंचायत त्याचप्रमाणे इतर राज्य यंत्रणा यांनी अंमलबजावणी करण्याच्या कामांचा समावेश करण्यात येतो. म.गां.रा.ग्रा.रो.ह.योजनांतर्गत २६० कामांचे संयोजन (Combination) अनुज्ञेय असुन या कामांपैकी २८ कामांमध्ये विविध विभागांच्या योजनांसोबत अभिसरण करण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे. ग्रामपंचायत पातळीवर वार्षिक कृती आराखडा तयार करतांना अभिसरणासाठी विविध विभागांकडून योजनांतर्गत उपलब्ध निधीचा विचार करण्यात यावा. त्याचप्रमाणे अभिसरण आराखड्यातील कामांच्या अंमलबजावणीमध्ये स्वयंसेवी संस्था (NGO) अथवा उद्योजकता सामाजिक दायित्व (CSR) यांच्या सहभागातून कामे घेण्यासाठी प्रयत्न करण्यास हरकत नाही. यासाठी जिल्हाधिकारी यांनी पुढाकार घेऊन आवश्यक कार्यवाही करावी.

या निधीच्या उपलब्धतेनुसार अभिसरणांतर्गत घ्यावयाची कामे वार्षिक कृती आराखडयामध्ये समाविष्ट करावीत. ग्रामपंचायत पातळीवर सरपंच व ग्रामसेवक यांनी नरेगा क्षेत्रिय नियोजन अधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार ग्रामपंचायत अभिसरण नियोजन आराखडा वार्षिक कृती आराखड्या अंतर्गत तयार करावा.

या अभिसरण नियोजन आराखडयामध्ये खालील २८ कामांचा समावेश करण्यात यावा.

| अ.क्र. | कामाचे नांव |
|---|---|
| १ | शाळेसाठी / खेळाच्या मैदानासाठी सरंक्षक भिंत बांधकाम करणे |
| २ | छतासह बाजार ओटा |

| | |
|---|---|
| ३ | शालेय स्वयंपाकगृह निवारा |
| ४ | नाला-मोरी बांधकाम |
| ५ | सार्वजनिक जागेवरील गोदाम |
| ६ | सिमेंट रस्ता |
| ७ | पेव्हिंग ब्लॉक रस्ता |
| ८ | डांबर रस्ता |
| ९ | शाळेकरिता / खेळाच्या मैदानाकरिता साखळी कुंपण |
| १० | अंगणवाडी बांधकाम |
| ११ | ग्रामपंचायत भवन |
| १२ | सामुहीक मत्स्यतळे |
| १३ | सार्वजनिक जागेवरील शेततळे |
| १४ | कॉंक्रीट नाला बांधकाम |
| १५ | आर.सी.सी. मुख्य निचरा प्रणाली |
| १६ | भुमिगत बंधारा (१०मी x १.२०मी x ४.५मी) |
| १७ | भुमिगत बंधारा (१५मी x १.२०मी x ४.५मी) |
| १८ | भुमिगत बंधारा (२०मी x १.२०मी x ४.५मी) |
| १९ | सिमेंट नाला बांध १० मी लांब व १.० मी उंच |
| २० | सिमेंट नाला बांध १० मी लांब व १.२ मी उंच |
| २१ | सिमेंट नाला बांध १२ मी लांब व १.० मी उंच |
| २२ | सिमेंट नाला बांध १२ मी लांब व १.२० मी उंच |
| २३ | सिमेंट नाला बांध १५ मी लांब व १.० मी उंच |
| २४ | सिमेंट नाला बांध १५मी लांब व १.२०मी उंच |
| २५ | कॉम्पोझिट गॅबियन बंधारा |
| २६ | बचत गटांच्या जनावरांसाठी सामुहिक गोठे |
| २७ | स्मशानभूमी शेड बांधकाम |
| २८ | नाडेप कंपोस्ट |

**३) अभिसरण नियोजन आराखडा अंमलबजावणीची कार्यपध्दती :-**

i. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - आयुक्तालय स्तरावरुन अभिसरणासाठी २८ कामांचे अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत. या अंदाजपत्रकांमध्ये म.गां.रा.ग्रा.रो.ह.यो. अंतर्गत घेण्याचा अकुशल (Part-A) व कुशल भाग (Part-B) त्याचप्रमाणे **इतर योजनेमधून** घेण्याचा कुशल भागाचा (Part-C) समावेश करण्यात आलेला आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - आयुक्तालय स्तरावरुन निश्चित करुन देण्यात आलेल्या अंदाजपत्रकांचा उपयोग अभिसरणा अंतर्गत घेण्यात येणाऱ्या कामांच्या अंमलबजावणीसाठी करण्यात यावा. यामध्ये स्थानिकरित्या काही बदल करावयाचा असल्यास जिल्हास्तरीय अभिसरण समितीच्या मान्यतेने करण्यात यावा.

ii. या अंदाजपत्रकामध्ये म.गां.रा.ग्रा.रो.ह.यो. अंतर्गत घेण्याचा अकुशल (Part-A) व कुशल भाग (Part-B) त्याचप्रमाणे **इतर योजनेमधून** घेण्याचा कुशल भागाचा (Part-C) यांना तांत्रिक मान्यता संबंधित अंमलबजावणी यंत्रणाचे सक्षम अधिकारी यांनी देणे आवश्यक राहील.

iii. अभिसरण नियोजन आराखडयातील कामांना प्रशासकीय मान्यता ही म.गां.रा.ग्रा.रो.ह. योजनेची अंमलबजावणी करणारी कार्यान्वयीन यंत्रणा (PIA) यांचेमार्फत देण्यात येईल.

iv. **इतर योजनेमधून** घेण्यात येणाऱ्या कामांचा कुशल भाग (Part C) सध्या त्या त्या कामाकरिता सुरु असलेल्या सर्व जिल्हा व राज्यस्तरीय योजनेतून अनुज्ञेय राहील.

v. या कामांचे संपुर्ण मोजमाप संबंधित तांत्रिक अधिकाऱ्यांकडून घेण्यात येईल व त्याची नोंद म.गां.रा.ग्रा.रो.ह.योजनेच्या मोजमाप पुस्तिकेमध्ये घेणे बंधनकारक राहील.

vi. अभिसरणा अंतर्गत अंदाजपत्रकानुसार ज्या बाबींवर अंमलबजावणी यंत्रणा निधी उपलब्ध करुन देत आहे तेवढया बाबींचे मोजमाप संबंधी अभिलेख अंमलबजावणी यंत्रणेने म.गां.रा.ग्रा.रो.ह.योजनेच्या मोजमाप पुस्तिकेमधुन घेणे व त्याचा अंमलबजावणी यंत्रणेच्या संदर्भासाठी स्वतंत्र अभिलेख तयार करणे आवश्यक राहील.

vii. म.गां.रा.ग्रा.रो.ह.योजनेच्या अंतर्गत घेण्यात आलेल्या अकुशल कामांसाठी (Part-A) ई-मस्टर काढणे व मजुरांचे वेतन प्रचलीत पध्दती नुसार करण्यात यावे.

viii. म.गां.रा.ग्रा.रो.ह. योजनेंतर्गत घेण्यात आलेल्या कुशल कामासाठीची (Part-B) प्रदाने ही PFMS पध्दतीने करण्यात यावी.

ix. इतर योजनेमधुन घेण्यात आलेल्या कुशल भागाची (Part-C) प्रदाने संबंधित योजनेची अंमलबजावणी करणा-या विभागाने त्यांच्या प्रचलीत पध्दतीप्रमाणे करावी.

x. काम पुर्ण झाल्यानंतर या कामाचा पुर्णत्वाचा दाखला म.गां.रा.ग्रा.रो.ह.यो. यंत्रणा व अभिसरणामध्ये समाविष्ट इतर यंत्रणेच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने संयुक्त स्वाक्षरीने देणे आवश्यक राहील.

xi. अभिसरणांतर्गतची कामे ही ग्रामीण क्षेत्रामध्येच घेणे बंधनकारक आहे.

xii. अभिसरणांतर्गतच्या कामासाठी कंत्राटदार (Contractor) व मजुरांना विस्थापित करणाऱ्या यंत्रसामुग्रीचा वापर करता येणार नाही.

xiii. अभिसरणंतर्गत सुरु करण्यात येणारे प्रत्येक काम हे लेबर बजेट मध्ये समाविष्ट असणारे असावे. अभिसरणांतर्गत घेण्यात येणाऱ्या कामांचा समावेश समितीच्या मान्यतेने कोणत्याही वेळी करणे शक्य राहील.

xiv. अभिसरणामधुन घेण्यात येणारे प्रत्येक काम हे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे काम म्हणून हाताळण्यात यावे.

xv. अभिसरणांतर्गत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेशी संबंधित घेण्यात आलेल्या कामांचे संपूर्ण दस्ताऐवज / अभिलेखे ग्रामपंचायत स्तरावर ठेवण्यात यावेत.

**४) अंमलबजावणीमधील महत्वाचे टप्पे-**

शासनाच्या विविध विभागांच्या योजनांचे म.गां.रा.ग्रा.रो.ह. योजने सोबत अभिसरण करतांना अंमलबजावणीच्या खालील महत्वाच्या टप्प्यांवर विविध विभागाची यंत्रणा व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची यंत्रणा यांच्यामध्ये समन्वय असणे आवश्यक आहे.

**(i) नियोजन-**

प्रत्येक आर्थिक वर्षासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत वार्षीक कृती आराखडयाचे नियोजन दरवर्षी १५ ऑगस्ट ते ३० नोव्हेंबर या कालावधीमध्ये ग्रामसभेच्या माध्यमातून करण्यात येते. वार्षीक कृती आराखड्यामध्ये नियोजनाच्या टप्प्यावर विविध विभागाच्या यंत्रणांनी सहभागी होऊन त्यांचा विभागांतर्गत प्रस्तावित कामांमधील शक्य असलेल्या कामांमध्ये अभिसरणाचे नियोजन करणे आवश्यक आहे. हया कामांसाठी ग्राम पंचायत व इतर अंमलबजावणी यंत्रणांचे क्षेत्रीय अधिकारी / कर्मचारी यांच्यामध्ये समन्वय साधण्याची जबाबदारी तालुका अभिसरण समितीकडे सोपविण्यात येत आहे.

लेबर बजेट नियोजनासाठी जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांनी नियुक्त केलेल्या नरेगा नियोजन क्षेत्रीय अधिकारी यांनी सरपंच, ग्रामसेवक, ग्रामरोजगारसेवक यांचे सोबत सर्व अंमलबजावणी यंत्रणेच्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांची बैठक घेऊन प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये अभिसरणांतर्गत कामे प्रस्तावित करण्यात येतील याबाबत त्यांना प्रवृत्त करावे.

म.गा.रा.ग्रा.रो.ह.योजनेच्या कामांसोबत इतर अंमलबजावणी यंत्रणांच्या कामांचे अभिसरण करून त्याची अंमलबजावणी सन २०१८-१९ मध्ये सुद्धा करण्याची मुभा आहे. सन २०१८-१९ च्या वार्षिक कृती आराखड्यामध्ये अगोदरच समाविष्ट असलेल्या कामांसोबत अभिसरण करण्याच्या जिल्हा अभिसरण समन्वय समितीमध्ये निर्णय घेऊन अभिसरणासाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकानुसार तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात यावी. सन २०१८-१९ च्या वार्षिक कृती आराखड्यामध्ये समाविष्ट नसलेल्या कामांमध्ये अभिसरण करण्याचे प्रस्तावित असल्यास या कामांचा समावेश वार्षिक कृती आराखड्यामध्ये ग्रामपंचायत/ पंचायत समिती व जिल्हापरिषदेची मान्यता घेऊन करण्यात यावा. या समाविष्ट अभिसरण कामांची अंमलबजावणी दि.३१ मार्च, २०१९ पर्यंतेच्या आर्थिक वर्षामध्ये करण्यात यावी. तसेच, सन २०१९-२० या वर्षाच्या लेबर बजेटमध्ये अभिसरणांतर्गत घेण्यात येणाऱ्या कामाचा समावेश करण्यात यावा.

**(ii) कामांची अंमलबजावणी-**

वार्षीक कृती आराखड्यामध्ये समाविष्ट असलेल्या अभिसरणांतर्गत घेण्याच्या कामाची अंमलबजावणी करण्यासाठी त्यांची अंदाजपत्रके तयार करुन त्याला तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यासंदर्भात परिच्छेद-३ मध्ये आवश्यक सुचना देण्यात आलेल्या आहेत. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - आयुक्तालय स्तरावरुन विविध २८ कामांची अभिसरणा नुसार अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत. कामांच्या अंमलबजावणीसाठी या अंदाजपत्रकांचा वापर संबंधित यंत्रणांनी करावा. त्यामध्ये स्थानिकरित्या काही बदल असल्यास ते जिल्हा अभिसरण समितीच्या मान्यतेने करण्यात यावे. अंमलबजावणी करतांना म.गां.रा.ग्रा.रो.ह.योजनंतर्गत होणाऱ्या अकुशल व कुशल खर्चाचे प्रमाण जिल्हास्तरावर ६०:४० राहील याची दक्षता घ्यावी.

**(iii) व्यवस्थापन (संस्थात्मक व्यवस्था)-**

अभिसरणांतर्गतच्या कामांसाठी विविध विभागांमध्ये समन्वय प्रस्थापित करणे आवश्यक असून विशेषत: जिल्हास्तरावरील समितीने अभिसरण कामांच्या अंमलबजावणीमध्ये उद्भवणाऱ्या अडचणींची सोडवणूक करुन अभिसरण कामांच्या अंमलबजावणीसाठी संस्थात्मक व्यवस्था निर्माण करावी.

- विविध अभिसरण प्रकारानुसार संयुक्तपणे विविध प्रपत्रे माहितीसाठी तयार करण्यात यावीत.
- जिल्हाधिकारी यांनी जिल्हास्तरीय अभिसरण समितीची मासिक आढावा बैठक घ्यावी.
- म.गा.रा.ग्रा.रो.ह.योजनेमधील सामाजिक अंकेक्षण, लेखा विषयक व्यवस्थापन, MIS नोंदी हया अनिवार्य कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

सर्व जिल्हाधिकारी यांनी या शासन निर्णयामध्ये दिलेल्या सुचनांची अंमलबजावणी करुन जिल्हयाचा अभिसरण नियोजन आराखडा तयार करावा व अभिसरणा अंतर्गत विविध विभागांशी समन्वय प्रस्थापित करुन सार्वजनिक स्वरुपाच्या शाश्वत व उपयुक्त मत्ता निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून अभिसरण आराखड्याची अंमलबजावणी करावी.

उपरोक्त अभिसरण योजनेचे संनियंत्रण संबंधित विभागीय आयुक्तांनी करावे.

सदर शासन निर्णय मुख्यसचिव यांचे अध्यक्षतेखाली दि. १०/१०/२०१८ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८११०५१४४४३६५७१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Eknath Rajaram Dawale

Digitally signed by Eknath Rajaram Dawale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Soil and Water Conservation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=499dd4df91587ffef1e20a2ee9e560dd0777e49ff6cfc838f362fdbb58c58e7b, serialNumber=17e427867f9f7acf49f42a7e5b92b77d56ec1f261f185c142a9f28d7626190fb, cn=Eknath Rajaram Dawale
Date: 2018.11.06 14:22:01 +05'30'

**( एकनाथ डवले )**
**सचिव (रोहयो), महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपालांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद
४. मा.मंत्री (सर्व) / मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मुख्य सचिवांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
६. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
७. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
८. अपर मुख्य सचिव (कृषी) , कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
९. प्रधान सचिव (आदिवासी विकास) , आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
१०. प्रधान सचिव (जलसंपदा) , जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
११. प्रधान सचिव (सार्वजनिक बांधकाम), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
१२. सचिव (ग्रामविकास), ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
१३. सचिव (वने) , महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
१४. सचिव (सामाजिक न्याय), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
१५. सचिव (महिला व बाल विकास), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
१६. सचिव (वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
१७. सचिव (रोहयो) , नियोजन (रोहयो) विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
१८. सचिव (पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यसंवर्धन), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
१९. सर्व विभागीय आयुक्त
२०. आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे
२१. आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र, नागपूर
२२. सर्व जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर वगळून)
२३. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद
२४. मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग, पुणे,
२५. सर्व उपजिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर वगळून)

२६. सर्व उपवनसंरक्षक
२७. सर्व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी
२८. सर्व उपसंचालक सामाजिक वनिकरण
२९. सर्व प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
३०. सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत/ नरेगा)
३१. सर्व प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
३२. सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी (जिल्हा परिषद)
३३. सर्व सहाय्यक आयुक्त समाजकल्याण
३४. सर्व कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद
३५. सर्व कार्यकारी अभियंता (सार्वजनिक बांधकाम)
३६. सर्व जिल्हा रेशिम विकास अधिकारी
३७. सर्व कार्यकारी अभियंता (सिंचन), जिल्हा परिषद
३८. संचालक, फलोत्पादन, महाराष्ट्र राज्य, पुणे
३९. सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
४०. सर्व विभागीय कृषी सहसंचालक,
४१. सर्व उप सचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी, नियोजन विभाग (रोहयो), मंत्रालय, मुंबई,
४२. निवडनस्ती/का.मग्रारो-०१.